Vinyl Chemicals (India) Ltd.
Regd. Off. : 7th Floor, Regent Chambers, Jamnalal Bajaj Marg, 208, Nariman Point, Mumbai - 400 021.
Phone : 2282 2708 / 6982 9000
Website : www.vinylchemicals.com | Email : cs.vinylchemicals@pidilite.com
CIN : L24100MH1986PLC039837

7th October, 2025

The Secretary
BSE Ltd.
Corporate Relationship Dept.,
14th floor, P.J. Tower,
Dalal Street, Fort
Mumbai- 400 001
Stock Code-524129

The Secretary
National Stock Exchange of India Ltd.
Exchange Plaza, Plot no. C/1, G Block,
Bandra-Kurla Complex,
Bandra (E),
Mumbai- 400 051
Stock Code- VINYLINDIA

Dear Sir/Madam

**Sub.: <u>Newspaper publication regarding Special Window for Re-lodgement of Transfer Requests of Physical Shares.</u>**

Please find enclosed herewith copies of Newspaper clippings regarding a special window for re-lodgement of transfer request of physical shares published on 7th October, 2025 in Business Standard (Mumbai edition) in English and Tarun Bharat (Mumbai Edition).

Kindly take the same on your records.

Thanking You,

Yours faithfully,
For **VINYL CHEMICALS (INDIA) LTD.**

AARTI RAMASHANKAR FALORH

Digitally signed by: AARTI RAMASHANKAR FALORH
DN: CN = AARTI RAMASHANKAR FALORH C = IN O = Personal
Date: 2025.10.07 12:06:12 +05'30'

**AARTI FALORH**
**COMPANY SECRETARY**

# झवेरी बाजार भारतीय रत्न, दागिने उद्योगाचा कणा

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन; कारागिरीला जगभरात मान्यता



**मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

''झवेरी बाजार हा भारतीय रत्न आणि दागिने उद्योगाचा कणा असून येथील कारागिरीला जगभरात मान्यता आहे. झवेरी बाजार परिसराचा कायापालट करण्यास शासन आवश्यक ते सर्व करतील,'' असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी केले.

'झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशन'च्यावतीने प्रथमच 'झवेरी बाजार जेम्स ॲण्ड ज्वेलरी फेस्टिव्हल २०२५'चे आयोजन करण्यात आले आहे. दि. २२ सप्टेंबर ते दि. २६ ऑक्टोबर रोजीदरम्यान हा उत्सव आयोजित करण्यात आला असून दि. ६ ऑक्टोबर ते दि. २६ ऑक्टोबर रोजीदरम्यान चालणाऱ्या मुख्य प्रदर्शनाचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार पडले. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी कौशल्य विकासमंत्री मंगल प्रभात लोढा, 'झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशन'चे अध्यक्ष हितेश जैन, सचिव किशोर जैन यांच्यासह ज्वेलरी क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''अनेक दशकांचा वारसा आणि देशाच्या अर्थव्यवस्थेत मोलाचा वाटा असलेल्या झवेरी बाजार परिसराला रत्न-आभूषण उत्सवामुळे सध्या नवे रूप आले आहे. या बाजार परिसराची पुनर्रचना आणि सुशोभीकरण करण्यासाठी 'झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशन'ने पुढाकार घ्यावा, राज्य शासनाच्या यंत्रणा त्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करतील. झवेरी बाजार हा भारतीय रत्न आणि दागिने उद्योगाचा कणा असून येथील कारागिरीला जगभरात मान्यता आहे. काळानुसार अडचणी असूनही झवेरी बाजाराने आपली परंपरा व वैभव टिकवले आहे.

### व्यावसायिकांनी आपल्या क्षमता वाढवाव्या

''या महोत्सवाच्या माध्यमातून येथील व्यापाऱ्यांना जागतिक स्तरावरील व्यापाऱ्यांशी संवाद साधण्याची संधी उपलब्ध झाली आहे. भारताच्या निर्यात क्षेत्रात या उद्योगाचा मोठा वाटा असून व्यावसायिकांनी आपल्या क्षमता वाढवत न्याव्या. या उद्योगाचे अर्थव्यवस्थेतील योगदानही वाढतच राहील. पंतप्रधान नरेंद्र मोदी नेहमी अडचणींमध्ये संधी शोधण्याची प्रेरणा देतात. त्याप्रमाणे आंतरराष्ट्रीय स्तरावर होणार कितीही अडचणी आल्या, तरीही रत्न आणि दागिन्यांच्या बाजाराचे महत्त्व कधीही कमी होणार नाही, उलट भविष्यात तो अधिक विस्तारेल,'' असे त्यांनी सांगितले.

### आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे व्यापार अधिक सक्षम करण्यावर भर देणार

'झवेरी बाजार वेल्फेअर असोसिएशन' आणि 'इंडिया गोल्ड मेटाव्हर्स'दरम्यान सामंजस्य करार करण्यात आला. या करारानुसार व्यापारामध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता, ब्लॉकचेन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून व्यापार अधिक सक्षम करण्यात येणार आहे. या कराराचेही मुख्यमंत्र्यांनी स्वागत केले. झवेरी बाजाराला प्रदर्शनाच्या रूपात साकारण्यात आलेला हा उपक्रम अत्यंत वैशिष्ट्यपूर्ण असून संपूर्ण परिसरच एका प्रदर्शन क्षेत्रात रूपांतरित झाला आहे. त्याचप्रमाणे कार्यक्रमात पारंपरिक सांस्कृतिक वारसा, परंपरा आणि आधुनिक सजावटीचे दर्शन घडविण्यात आले आहे.



### दागिन्यांचा 'भक्ति'मय उत्सव!

झवेरी बाजारच्या मध्यवर्ती भागात अयोध्यातील राम मंदिराची प्रतिकृती तयार करण्यात आली आहे. एका बाजूला या महोत्सवामधील रोषणाई डोळे दीपावणारी असून दुसऱ्या बाजूला, मध्यवर्ती भागात असलेल्या राम मंदिराच्या प्रतिकृतीने सर्वत्र भक्तिमय वातावरण तयार झाले आहे. काही दिवसांतच दिवाळीच्या खरेदीसाठी सर्वांची लगबग सुरू होणार आहे. या पार्श्वभूमीवर, झवेरी बाजारच्या व्यापारविश्वामध्ये सुरू असलेली तयारी, ग्राहकांच्या मागणीनुसार तर कधी कारागिरांच्या कौशल्यानुसार दागिने घडवण्याचे, राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय ग्राहकांपर्यंत ते दागिने पोहोचवण्याचे काम आता जोमाने सुरू झाले आहे. या महोत्सवाच्या माध्यमातून व्यापाऱ्यांच्या अर्थकारणाला आणि ग्राहकांच्या खरेदीला चालना मिळेल असे दिसून येत आहे.

# डिसेंबरअखेरपर्यंत 'मेट्रो ९', 'मेट्रो ४' सुरू करण्यात यावी

## परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांचे निर्देश



**मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

''ठाणे आणि मिरा-भाईंदर क्षेत्रातील 'मेट्रो ९' मार्गिका दि. १५ डिसेंबर रोजीपर्यंत, तर 'मेट्रो ४' मार्गिका डिसेंबर अखेर सुरू करा,'' असे निर्देश परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले. 'मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणा'च्या बैठकीत बोलत होते.

बैठकीमध्ये 'मुंबई महानगर क्षेत्र विकास प्राधिकरणा'च्या माध्यमातून चालू असलेल्या ठाणे आणि मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील विविध विकासकामांचा आढावा घेण्यात आला. त्यामध्ये घोडबंदर मार्गाचा भाग असलेल्या कापुरबावडी ते गायमुख या १०.३२ किमी मार्गाच्या सेवारस्त्याचे काँक्रिटीकरण करून मुख्य रस्त्यामध्ये विलीन करण्याचे काम डिसेंबर अखेर पूर्ण करण्याच्या सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या. ''ठाणे आणि मिरा-भाईंदर महापालिका क्षेत्रातील अंतर्गत रस्त्यांची कामे तातडीने पूर्ण करावी. विशेषतः मिरा-भाईंदर महापालिका हद्दीतील छत्रपती शिवाजी महाराज पुतळा ते महाराणा प्रताप पुतळादरम्यानच्या रस्त्याचे काँक्रिटीकरण जलद गतीने करावे,'' अशी सूचना मंत्री सरनाईक यांनी दिल्या.

### मेट्रो पुलाच्या खाली उद्याने विकसित करा

''मेट्रोच्या पुलाचे काम करत असताना त्याखालील मोकळ्या जागेमध्ये भविष्यात अतिक्रमण होऊन ते विद्रूप होऊ नये, यासाठी नागपूर मेट्रो प्रकल्पाच्या धर्तीवर येथे सुशोभीकरण करून उद्याने उभी करावीत. त्या जागांची चांगल्या प्रकारे देखभाल करता यावी, यासाठी जाहिरातीच्या मोबदल्यात कायमस्वरूपी देखभाल करणाऱ्या संस्था नेमण्यात याव्यात,'' अशी सूचना मंत्री प्रताप सरनाईक यांनी केली.

### मेट्रो स्थानकांना मूळ गावांची नावे द्यावीत

''डोंगरी आणि मोघरपाडा येथे होणाऱ्या कारशेडच्या प्रकल्पाबाबतदेखील आढावा घेण्यात आला. तसेच, भविष्यात ठाणे आणि मिरा-भाईंदर शहरात होणाऱ्या मेट्रो स्थानकांना तेथील मूळ गावांची नावे द्यावीत. यामुळे तेथे गावची संस्कृती आणि परंपरा या दोन्हीची ओळख निर्माण होईल,'' असे प्रतिपादन मंत्री सरनाईक यांनी सांगितले.

# शिवडी पोलिसांकडून तरुणाला बेकायदेशीरपणे अटकेचा निषेध

## मूळ पोस्ट करणाऱ्यावर कारवाई का केली नाही?




**मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

एका युवकाला धर्माविरुद्ध भावना भडकाविल्याच्या आरोपाखाली शिवडी पोलिसांनी अटक केली आहे. याविरोधात 'विश्व हिंदू परिषदे'च्या कार्यकर्त्यांनी रविवार, दि. ५ ऑक्टोबर रोजी दुपारी शिवडी पोलीस ठाण्यासमोर आंदोलन केले. या कारवाईला बेकायदेशीर अटक ठरवत, याप्रकरणी 'विश्व हिंदू परिषदे'चे मुंबई शहर विभागमंत्री राजीव चौबे यांनी पोलिसांना निवेदन सादर केले.

मिळालेल्या माहितीनुसार, संजय चौधरी असे पोलिसांनी अटक केलेल्या तरुणाचे नाव आहे. त्याने दि. २ ऑक्टोबर रोजी त्याच्या सोशल मीडियावरील स्टेटसमध्ये 'एक्स मुस्लीम' अशी ओळख सांगणाऱ्या व्यक्तीची एक कमेंट वापरली होती. या कारणावरून त्याच्याविरोधात 'भारतीय न्याय संहिता २०२४'च्या 'कलम २९९'अंतर्गत नोटीस देण्यात आली. ही तरतूद जामीनपात्र गुन्ह्याशी संबंधित आहे.

### चौकशी करून योग्य ती कारवाई करू

शिवडी पोलीस ठाण्याचे वरिष्ठ निरीक्षक रोहित खोत यांनी सांगितले की, ''कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, म्हणून चौधरींना खबरदारीचा उपाय म्हणून ताब्यात घेण्यात आले. विशिष्ट समुदायाकडून तक्रारी आल्यावर आम्ही त्यांना अटक केली. मात्र, नंतर जामीन देण्यात आला. 'विश्व हिंदू परिषदे'ने दिलेल्या निवेदनावर आम्ही चौकशी करून योग्य ती कारवाई करू,'' असेही त्यांनी सांगितले.

### कोणताही पुरावा नसताना कारवाई

'विश्व हिंदू परिषदे'चे प्रांतमंत्री मोहन सालेकर यांनी म्हटले आहे की, ''पोलिसांनी जमावाच्या दबावाखाली चौधरींवर खटला दाखल केला. 'कलम २९९' हा जामीनपात्र गुन्हा असून, कोणताही ठोस पुरावा नसताना कारवाई करण्यात आली. शिवडी पोलिसांनी घटनेचे गांभीर्य न समजता, कुणाच्यातरी दबावाला झुकून तरुणावर अन्याय केला? पोलीस ठाण्याच्या अधिकाऱ्यांनी संविधानिक मर्यादेत काम करावे, जमावाच्या दबावाखाली नव्हे. चौधरींना जबरदस्तीने माफी मागायला लावण्यात आली आणि पोलिसांच्या उपस्थितीत त्याचा व्हिडिओ करून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आला. हे पूर्णपणे असंविधानिक आहे.''

### गुन्हा नसताना पोलीस कोठडीत का ठेवले?

राजीव चौबे म्हणाले की, ''चौधरी यांनी स्वतःचा व्हिडिओ बनवलेला नाही. त्यांनी केवळ दुसऱ्या व्यक्तीने आधी अपलोड केलेला व्हिडिओ शेअर केला होता. त्या व्हिडिओत 'सुरह अल-अहझाब' या कुराणातील एका आयतीत नमूद केलेल्या विवाह नियमांबद्दल चर्चा होती. आम्ही तपासल्यावर ती आयत प्रत्यक्षात अस्तित्वात असल्याचे दिसून आले. मग चौधरींनी गुन्हा न करता त्यांना २४ तास पोलीस कोठडीत का ठेवले? जर तो व्हिडिओ आक्षेपार्ह असेल, तर मूळ पोस्ट करणाऱ्यावर कारवाई का केली नाही?'' असा प्रश्नदेखील चौबे यांनी उपस्थित केला.

# 'भाजप मुंबई अनुसूचित जाती मोर्चा'तर्फे अमित साटम यांचा सत्कार

**मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

'भाजप मुंबई अनुसूचित जाती मोर्चा'तर्फे मुंबई भाजप अध्यक्ष अमित साटम यांचा सत्कार करण्यात आला. अध्यक्ष शरद कांबळे, माजी मंत्री भाई गिरकर यांच्या मार्गदर्शनाखाली सोहळा संपन्न झाला. या मेळाव्यास मुंबईतील विविध समाजघटकांतील नागरिक आणि कार्यकर्ते उपस्थित होते. दरम्यान, अमित साटम यांनी केंद्रातील नरेंद्र मोदी सरकार आणि राज्यातील देवेंद्र फडणवीस यांच्याच्या महायुती सरकारने गेल्या ११ वर्षांत समाजासाठी केलेल्या विविध कार्यांची माहिती दिली.



''इंदू मिल येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक, लंडन येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे घर, महू येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक, दिल्ली येथील संविधान भवन आणि नुकतेच हाँगकाँगमधून भगवान गौतम बुद्धांच्या ३३४ अवशेषांचे १२७ वर्षांनंतर भारताच्या भूमीत पुनरागमन या कार्यांची माहिती दिली. यावेळी, राज्य सरकारकडून महापालिकेच्या २८ हजार सफाई कामगारांना मालकीहक्काचे घर लवकरात लवकर मिळवून देऊ,'' असे आश्वासन साटम यांनी दिले, तर समाजबांधवांनी आगामी महापालिका निवडणुकीत भाजपच्या पाठीशी उभे राहण्याची ग्वाही दिली आणि महायुतीस विजयी करण्याचा संकल्प केला.

# सेवाभावी प्रकल्पांचा महाविद्यालयीन अभ्यासात समावेश व्हावा : विजय पुराणिक




**मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

''सेवाभावी प्रकल्पांचा अभ्यास महाविद्यालयीन अभ्यासक्रमात समाविष्ट व्हावा. विद्यार्थ्यांनी अशा प्रकल्पांमध्ये प्रत्यक्ष सहभाग घ्यावा,'' असे प्रतिपादन 'राष्ट्रीय सेवा भारती'चे संयुक्त महामंत्री विजय पुराणिक यांनी केले.

दि. ५ ऑक्टोबर रोजी बी. एन. वैद्य सभागृह दादर येथे बस्ती परिवर्तन योजनाचा चतुर्थ वर्धापन दिन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी, प्रमुख वक्ता म्हणून त्यांनी उपस्थितांना त्यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले की, ''सेवाकार्य निष्ठा, स्पष्ट उद्दिष्ट आणि समाजपरिवर्तनाच्या भावनेने केले पाहिजे. तेव्हाच समाजात खरी प्रगती आणि सकारात्मक बदल घडू शकतात.'' याप्रसंगी 'कुमार प्रोसेस कन्सल्टंट्स ॲण्ड केमिकल्स प्रा. लि. (कुमार फिल्टर्स)'चे संस्थापक सुधीर पिसाट प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमात चार वर्षांच्या यशस्वी प्रवासाचे दर्शन घडविणारी लघु चित्रफीत, गुणवंत कार्यकर्त्यांचा सन्मान, 'सुदृढ बालक-जागरूक माता' या स्पर्धात्मक अभियानातील विजेत्यांचा गौरव करण्यात आला. 'सेवा भारती' कोकण प्रांताच्या माध्यमातून मागील चार वर्षांपासून मुंबईतील ५३ वस्त्यांमध्ये माता-बाल आरोग्य आहार प्रकल्प, किशोरी विकास, बालसंस्कार, वाचनालयसेवा आणि रुग्णोपयोगी साहित्यसेवा असे एकूण ९८ सेवा प्रकल्प यशस्वीपणे राबविले जात आहेत. सुमारे १०० वस्ती कार्यकर्ते आणि ७५ सहयोगी कार्यकर्त्यांच्या अथक परिश्रमांमुळे वस्त्यांमध्ये लक्षणीय सकारात्मक बदल दिसून येत आहे.

**मध्य रेल्वे**

**पॉलीयूरिया कोटींगची तरतूद (पुरवठा आणि वापर)**

ब्रेक व्हॉल्व्ह टेस्टींग रूम्सकरिता शॉप फ्लोअर क्षेत्राच्या पॉलीयूरिया कोटींगची तरतूद (पुरवठा आणि वापर), परिमाण - ७०० चौ.मी. उप मुख्य विद्युत अभियंता (ईएमयू), २रा मजला, नवीन प्रशासकीय इमारत, डब्बा कारखाना, मध्य रेल्वे, माटुंगा, मुंबई - १९ हे माटुंगा कारखाना येथे 'ब्रेक व्हॉल्व्ह टेस्टींग रूम्सकरिता शॉप फ्लोअर क्षेत्राच्या पॉलीयूरिया कोटींगची तरतूद (पुरवठा आणि वापर)', परिमाण-७०० चौ.मी. या कामाकरिता एकल ई-निविदा आमंत्रित करीत आहेत. **कामाची अंदाजित किंमतः** ₹ २९,२८,१००/-, **ईएमडीः** रु. ५८,६००/- **निविदा दस्तऐवजाची किंमतः** रु. शून्य, **पूर्तता कालावधीः** ०६ महिने, **बंद होण्याचा दिनांक/वेळः** २९.१०.२०२५ रोजी १५.०० वा. पर्यंत. निविदा फक्त ई-निविदा स्वरुपात वेबसाईट **www.ireps.gov.in** द्वारे स्वीकारण्यात येईल. निविदा दस्तऐवज वेबसाईटमध्ये उपलब्ध आहे. **निविदा क्र. ईएसटी/ईएमयू/एमटीएन/बीई/पॉलीयुरिया/०३/०६-२०२५** 517

रेल्वे मार्गाजवळ असुरक्षित आणि अनधिकृत काम करणे दंडनीय अपराध आहे

**परिशिष्ट 16 सूचना**

श्री. के. के. कुट्टप्पन हे भाविनी एन्क्लेव्ह को-ऑप. हौ. सोसा. लि. पत्ता - ऑफ चाफेकर बंधू मार्ग, मुलुंड (पूर्व), मुंबई - ४०० ०८१ चे सदस्य आणि सदर संस्थेच्या इमारतीच्या सातव्या मजल्यावरील सदनिका क्र. १-डी-७०२ चे सौ. ए. व्ही. नलिनी यांच्यासह धारक आहेत, श्री. के. के. कुट्टप्पन यांचे कोणतेही नामनिर्देशन न करता दि. २०.०६.२०२० रोजी निधन झाले.

संस्था वारसदार किंवा वारसदारांकडून किंवा इतर दावेदार/आक्षेपदारांकडून दिवंगत सदस्याच्या संस्थेतील भांडवल/मालमत्तेमधील सदर भाग आणि हितसंबंध हस्तांतरित करण्याकरिता दावा किंवा आक्षेप, दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील भाग/हितसंबंध हस्तांतरित करण्याकरिता त्याच्या/तिच्या/त्यांच्या दावे/आक्षेपाच्या पृष्ठ्यर्थ कागदपत्रे आणि इतर पुराव्यांच्या प्रतींसह याद्वारे सदर सूचना प्रसिद्ध होण्याच्या दिनांकापासून १४ दिवसांच्या कालावधीमध्ये मागवित आहेत. जर कोणतेही दावे/आक्षेप वर उल्लेखिलेल्या कालावधीमध्ये प्राप्त झाले नाहीत तर संस्था दिवंगत सदस्याचे संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंधाबाबत संस्थेच्या उप-विधींमध्ये देण्यात आलेल्या पद्धतीने व्यवहार करण्यास मुक्त असेल. दिवंगत सदस्याच्या संस्थेच्या भांडवल/मालमत्तेमधील भाग आणि हितसंबंधाच्या हस्तांतरणाकरिता जर कोणतेही दावे/आक्षेप संस्थेस प्राप्त झाल्यास त्यावर संस्थेच्या उप-विधीअंतर्गत देण्यात आलेल्या पद्धतीमध्ये कार्यवाही केली जाईल. दावेदार/आक्षेपदारांद्वारे संस्थेच्या नोंदणीकृत उप-विधींची प्रत तपासणीकरिता सूचना प्रसिद्धीच्या दिनांकापासून तिच्या कालावधी समाप्तीच्या दिनांकापर्यंत सायं. ६.३० ते सायं. ८ वाजेपर्यंत संस्थेच्या कार्यालयात/संस्थेच्या सचिवांकडे उपलब्ध आहे.

ठिकाणः मुंबई
दिनांकः ७.१०.२०२५

भवानी एन्क्लेव्ह को-ऑप. हौ. सोसा. लि.
करिता आणि त्यांच्या वतीने
मान. सचिव

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड**

**सीआयएनः** एल२४१००एमएच१९८६पीएलसी०३९८३७
**नोंदणीकृत कार्यालयः** रिजन्ट चेंबर्स, ७वा मजला, जमनालाल बजाज मार्ग, २०८, नरिमन पॉईंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी: २२८२ २७०८/६९८२९०००
**वेबसाइटः** www.vinylchemicals.com

**भौतिक समभागांकरिता हस्तांतरण विनंत्या फेरदाखल करण्यासाठी विशेष सुविधेबाबतची सूचना**

सर्व भागधारकांना येथे कळविण्यात येते की, सेबीने २ जुलै २०२५ ला जारी केलेले परिपत्रक क्रमांक सेबी/एचओ/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७ नुसार, १ एप्रिल २०१९ या अंतिम मुदतीपूर्वी दाखल केलेल्या आणि कागदपत्रांमधील त्रुटींमुळे नाकारलेल्या किंवा परत केलेल्या / कोणतीही प्रक्रिया न केलेल्या किंवा अन्य कारणांमुळे प्रक्रिया न केलेले हस्तांतरण करार फेरदाखल करता येण्यासाठी **७ जुलै, २०२५ ते ६ जानेवारी, २०२६** या ६ महिन्यांच्या कालावधीसाठी एक विशेष सुविधा देण्यात आली आहे.

संबंधित गुंतवणूकदारांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी आमचे रजिस्ट्रार आणि ट्रान्सफर एजंट्स (आरटीए), मेसर्स एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड, युनिटः विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड, सी-१०१, पहिला मजला, २४७ पार्क, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०० ०८३, यांच्याकडे वरील कालावधीत भौतिक समभागांच्या हस्तांतरणाची आपली विनंती पुन्हा दाखल करावी. आम्ही सर्व संबंधित गुंतवणूकदारांना या एक वेळच्या मुदतीचा लाभ घेण्याचे आवाहन करतो.

**विनाईल केमिकल्स (इंडिया) लिमिटेड करिता**
सही/-
**आरती फालोर**
**कंपनी सचिव**
**एफसीएस ८७२६**

ठिकाण : मुंबई
दिनांक : ६ ऑक्टोबर, २०२५

**बृहन्मुंबई महानगरपालिका**

**(घन कचरा व्यवस्थापन, आर/मध्य विभाग.)**
सहा.अभि./६०८५/आर-मध्य/घकव्य दि. ०३.१०.२०२५

**स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात**

**विषय :-** आर/मध्य विभागामधील मुख्य रस्ते तसेच व्ही.आय.पी. रस्त्यांच्या ठिकाणी दुसऱ्या पाळी मध्ये साफसफाई स्वयंसेवी संस्थांमार्फत मनुष्यबळ घेण्याबाबत.

आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन खात्यामार्फत, आर/मध्य विभागामधील मुख्य रस्ते तसेच व्ही.आय.पी. रस्त्यांच्या ठिकाणी दुसऱ्या पाळी मध्ये साफसफाई करीता विभाग कार्यालयाच्या कार्यक्षेत्रात नोंदणीकृत असणाऱ्या इच्छुक स्थानिक कामगार सहकारी संस्था, सेवा सहकारी संस्था, बेरोजगार सेवा सहकारी संस्था, अशासकिय संस्था (या सर्व संस्थांचा स्थापनेचा उद्देश त्यांच्या सभासदांना रोजगार मिळविणे हा असावा) इ. संस्थांकडून त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करुन काम करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु. ३६३०/- अधिक १८ टक्के वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात भरुन **दि. ०३/१०/२०२५ ते दि. ०८/१०/२०२५, सकाळी १०.०० ते दुपारी ०२.०० यावेळेत** विकत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधून सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप आर/मध्य विभागाचे सहाय्यक आयुक्त योजनेच्या अटी व शर्तीनुसार करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख **दि. ०८/१०/२०२५ (दुपारी ०३.०० वाजेपर्यंत).**


नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-
**सहाय्यक अभियंता**
**(घ.क.व्य.)**
**आर/मध्य विभाग**

पीआरओ/१८०८/जाहि./२०२५-२६
**स्वमर्जीने औषधोपचार करू नका**

# मालेगावमधील बोगस मतदारांची नावे रद्द करा : किरीट सोमय्या

**मुंबई :** मालेगाव महानगरपालिकेने ३ हजार, २७३ अपात्र लोकांचे जन्मप्रमाणपत्र रद्द केले असून त्यांची नावे मतदारयादीतून वळण्यात यावी, या मागणीसाठी माजी खा. किरीट सोमय्या यांनी सोमवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी 'केंद्रीय निवडणूक आयोगा'ला पत्र लिहिले आहे. मालेगाव महानगरपालिकेने गेल्या आठवड्यात ३ हजार, २७३ विलंबित जन्मनोंदणी प्रमाणपत्रे रद्द केली असून अर्जदारांनी ही प्रमाणपत्रे बनावट पद्धतीने मिळवली होती. ही ३ हजार, २७३ नावे जन्मनोंदणीच्या सीएसआर पोर्टलवरूनदेखील वगळण्यात आली आहेत. याबाबतची तक्रार मिळाल्यानंतर, महाराष्ट्र सरकारने एसआयटीही नियुक्त केली होती. तसेच पाच एफआयआर नोंदवण्यात आले असून ५३९ आरोपींची नावे आरोपपत्रात समाविष्ट करण्यात आली आहेत. यासंदर्भातील पुढील चौकशी सुरू आहे. ''अलीकडेच 'यूआयडीएआय'ने महाराष्ट्रातील ४७ हजार आधारकार्ड रद्द केले आहेत.



या ४७ हजार व्यक्तींनी २०२४ मध्ये बनावट कागदपत्रे सादर करून जन्मप्रमाणपत्रे मिळवली होती. त्यांच्याकडे भारतात जन्म झाल्याबद्दल कोणतेही अधिकृत कागदपत्र किंवा पुरावे नाहीत. त्यानंतर आता त्यांचे आधारकार्ड रद्द आणि बनावट पद्धतीने मिळवलेले जन्मप्रमाणपत्र रद्द करण्यात आले आहेत. शेकडो अर्जदारांनी विलंबित जन्मनोंदणी प्रमाणपत्रासाठी अर्जासोबत त्यांचे मतदार ओळखपत्रदेखील जोडले आहे. त्यामुळे मतदारयादीतील या ३ हजार, २७३ व्यक्तींची नावे वगळण्यात यावी,'' अशी मागणी किरीट सोमय्या यांनी या पत्राद्वारे निवडणूक आयोगाला केली आहे.

# ग्रीन स्टील उद्योगांसाठी धोरण तयार करणार : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई, दि. ६ : प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य सौर पॅनेलनिर्मिती क्षेत्रात देशात आघाडी घेत असून या क्षेत्रामध्ये होत असलेल्या भरीव कामामुळे मोठी 'ग्रीन इको सिस्टम' निर्माण होणार आहे. ग्रीन स्टील हे नवीन क्षेत्र असल्याने यासंदर्भात धोरण तयार करण्यासाठी एका समितीचे गठण करण्यात येत असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवार, दि. ६ ऑक्टोबर रोजी सांगितले.

मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली उद्योग विभागाच्या मंत्रिमंडळ उपसमितीची १३वी बैठक पार पडली. यावेळी उपमुख्यमंत्री अजित पवार, उद्योगमंत्री डॉ. उदय सामंत, मुख्य सचिव राजेश कुमार, अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) ओ. पी. गुप्ता यांच्यासह इतर अधिकारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ''कृषी आणि अन्नप्रक्रिया क्षेत्रातील विशाल-अतिविशाल उद्योगांना सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. जागतिक करसंरचनेच्या बदलामुळे विदर्भ आणि मराठवाडा विभागातील वस्त्रोद्योगावर झालेल्या परिणामाच्या पार्श्वभूमीवर विद्युतशुल्क सवलतीची औद्योगिक अनुदानातून वजावट केली जाणार नाही. तसेच, विदर्भ, मराठवाडा या वर्गीकृत क्षेत्राकरिता कॅप्टीव्ह प्रोसेस व्हेंडर संदर्भातील तरतुदींमध्ये सुधारणा करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्यातील खेड तालुक्याचे वर्गीकरण 'अ', 'क' वर्गीकृत तालुका क्षेत्रात करण्यात आले असल्याने 'खेड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा. लि.' आणि 'खेड डेव्हलपर्स लि.' यांना 'क' वर्गीकृत तालुक्याचे फायदे लागू करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. 'मे. ओपी मोबिलीटी एक्सटेरिअर इंडिया प्रा. लि.' या कंपनीत ९० टक्के महिला कार्यरत असून या कंपनीने पुणे जिल्ह्यातील कामगारांना रोजगार मिळवून दिला आहे. त्यामुळे या कंपनीस मोठ्या प्रकल्पाचा दर्जा देण्याचा निर्णय मंत्रिमंडळ उपसमितीच्या बैठकीत घेण्यात आला. त्याचबरोबर, थ्रस्ट सेक्टर धोरणांतर्गत प्रकल्पांना प्रोत्साहन देय करण्यासंदर्भात ग्रीन स्टीलसंदर्भात नियुक्त होणाऱ्या समितीने विचार करावा,'' असे निर्देशही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.